**पीजीए क्र. १/१८**
**निशानी क्र. यु-६**

**<u>शपथेवर उलटतपास गैरअर्जदारातर्फे विधिज्ञ श्री. आर.एस. भोसले</u>**

मी एसटी महामंडळात वाहक पदावर लागलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझी नेमणुक दि. ०१.१२.१९७६ रोजी झाली. माझी नेमणुक दि. १.४.१९७६ रोजी झाली हे दाखविण्याकरीता मी कोणतेही दस्त दाखल केले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मला दि. २७.०७.१९७७ व २०.०९.१९७७ रोजी खंड देऊन दि. १५.०७.१९७८ रोजी पुर्ननेमणुक देण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, मला दि. ०१.०१.१९९६ रोजी अप्रामाणिकपणाचा ठपका ठेऊन सेवेतुन कमी करण्यात आले होते. हे म्हणणे खरे की, मी सदर बडतर्फीच्या आदेशाविरुध्द प्रथम कार्यालयीन अपील दाखल केले होते. हे म्हणणे खरे की, त्या अपीलामध्ये सुनावणी होऊन मला सुरुवातीच्या मुळ वेतनावर पुर्ननेमणुक देण्यात आली. हे म्हणणे खरे की, त्या आदेशाप्रमाणे मी दि. ०२.०५.१९९६ रोजी सेवेत रुजू झालो.

हे म्हणणे खरे की, त्यानंतर पुन्हा मला दि. २४.१२.१९९८ रोजी अप्रामाणिकपणाचा ठपका ठेउन महामंडळाने सेवेतून बडतर्फ केले. हे म्हणणे खरे की, सदरहू बडतर्फीच्या आदेशाविरुध्द जालना कामगार न्यायालयात तक्रार क्र. २३६/२००१ दाखल केली. हे म्हणणे खरे की, कामगार न्यायालयाने पुर्व पदावर पुर्नस्थापित करण्याचे आदेश दिले परंतु मागील वेतन नामंजूर केले. हे म्हणणे खरे की, त्या आदेशाप्रमाणे मला दि. १७.०६.२००३ रोजी पुर्नस्थापित करण्यात आले. हे म्हणणे खरे की, त्यानंतर मला दि. २०.०५.२००६ रोजी अप्रामाणिकपणाचा ठपका ठेऊन बडतर्फ करण्यात आले. हे म्हणणे खरे की, सदरहू बडतर्फीच्या आदेशाविरुध्द मी पुन्हा कार्यालयीन अपील दाखल केले. हे म्हणणे खरे आहे की, सदरहू कार्यालयीन अपीलात झालेल्या आदेशाप्रमाणे मला पुर्ननेमणुक देण्यात आली. हे म्हणणे खरे की, त्या आदेशाप्रमाणे मी दि. २२.०९.२००६ रोजी सेवेत रुजू झालो. हे म्हणणे खरे की, मला दि. ०५.०४.२०१० रोजी अप्रामाणिकपणाचा ठपका ठेऊन बडतर्फ करण्यात आले. हे म्हणणे खरे की, सदरहू बडतर्फीच्या आदेशाविरुध्द या न्यायालयात तक्रार क्र.

२३/२०१२ दाखल केली होती व न्यायालयाने बडतर्फीचा आदेश दि. १०.१०.२०१४ रोजी रदद केला. हे म्हणणे खरे की, कामगार न्यायालयाच्या सदरहू आदेशाविरुध्द महामंडळाने औदयोगिक न्यायालयात रिव्हीजन अर्ज क्र. १८/१५ दाखल केला होता. हे म्हणणे खरे की, त्या प्रकरणात माझे व महामंडळादरम्यान तडजोड झाली. हे म्हणणे खरे की, सदरहू प्रकरणात माझे वकील श्री. देशमुख होते. हे म्हणणे खरे की, मी व महामंडळाने औदयोगिक न्यायालयासमक्ष रिव्हीजन दाखल केले होते. (साक्षीदारास महामंडळाच्या वकीलांनी एक दस्त दाखविला व त्यावर त्याची सही असल्याचे विचारले.) मला दाखविलेल्या दस्तावर माझी सही आहे. हे म्हणणे खरे की, सदरहू तडजोड मला मान्य असल्यामुळे मी सदरहू दस्तावर सही केली होती. (जे दस्त साक्षी दारास दाखविले ते निशानी क्र. सी-५ च्या यादीप्रमाणे अभिलेखावर घेण्यात आले) सदरहू दस्ताला निशानी क्र. सी-६ देण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, मी उपदानाची रक्कम व इतर थकबाकी सदरहू तडजोडीप्रमाणे सोडून दिली आहे व ती मला मागण्याचा अधिकार नाही. (साक्षीदारास कथीतपणे त्याने महामंडळाकडे दिलेल्या अर्जाची प्रत दाखविण्यात आली.) सदरहू अर्ज मी महामंडळास लिहून दिला होता.
(साक्षीदारास दाखविलेला अर्ज निशानी सी-५ च्या यादीत समावेश करण्यात आला) सदरहू अर्जाच्या प्रतीला निशानी क्र. सी-७ देण्यात आले. हे म्हणणे खरे की, सदर अर्जाच्या अनुषंगाने मला दि. २२.०९.२००६ रोजी पुर्ननेमणुक देण्यात आली व अखेर मी
दि. ३०.०९.२०१५ रोजी सेवानिवृत्त झालो.

सेवानिवृत्तीच्या वेळेस माझे मुळ वेतन रु. ६,०५३/- होते व महागाई भत्ता रु. ७,२०३/- होता. हे म्हणणे खरे की, मला महामंडळाने ०३ वर्षाची सेवा गणना करुन उपदानापोटी रक्कम रु. २२,९४३/- दिली. हे म्हणणे खरे नाही की, महामंडळाने मला

उपदानापोटी देय असलेली संपूर्ण रक्कम दिलेली आहे व आता कोणतीही रक्कम थकीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी ३९ वर्षाची सेवा पुर्ण केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, अप्रामाणिकपणाचा ठपका ठेऊन मला सेवेतून कमी केल्यामुळे मी बडतर्फ कालावधीच्या संदर्भात उपदानाच्या रकमेस पात्र नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटया मागणीकरीता खोटा अर्ज दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

फेरतपास नाही

सदरचा जवाब वाचला व मान्य केला

दिनांक – ११.०२.२०२०
ठिकाण – नांदेड

न्यायाधीश,
कामगार न्यायालय, नांदेड